मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# जय सियारामचा नारा मंगलमय पिंपरी-चिंचवड अन् पाच लाखाहून अधिक रामभक्तांची रथयात्रा!

## जिल्ह्याजिल्ह्यात वाद निर्माण करणे, हे भारतीय जनता पक्षाचे हिंदुत्व आहे

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

अत्यंत भक्तीमय भगवामय आणि मंगलमय वातावरण फुलांचा वर्षाव अन् ढोल-ताशांच्या निनादामध्ये चौका-चौका होणारे स्वागत फटाक्यांचे तुफान आतिषबाजी आणि 'जय सियाराम' चा गगणभेदी नारा अशा उत्साहाच्या आणि भक्ती-भावाच्या वातावरणात तब्बल ५ लाख हून अधिक पिंपरी-चिंचवडकर रामभक्तांनी सहभागी होत महाराष्ट्रातील सर्वात मोठी रथयात्रा यशस्वी केली. राम जन्मभूमी अयोध्येतील श्रीराम मंदिर राष्ट्रार्पण व मूर्ती प्राणप्रतिष्ठा निमित्त पिंपरी-चिंचवडमध्ये हिंदूत्ववादी आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने रविवारी सायंकाळी भव्य



'रथयात्रा' आयोजित केली होती. त्याला रामभक्त, हिंदू बांधवांनी प्रचंड प्रतिसाद दिला.देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते जन्मभूमी अयोध्या येथील प्रभू श्रीराम मंदिराचे राष्ट्रार्पण आणि मूर्ती प्राणप्रतिष्ठा होणार आहे. त्यासाठी देशभरामध्ये उत्सवाचे आणि आनंदाचे वातावरण आहे. पिंपरी-चिंचवडमध्येही गेल्या सात दिवसांपासून आमदार लांडगे यांनी विविध धार्मिक, अध्यात्मिक, सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केले आहे. निगडी येथील भक्ती-शक्ती चौक येथून रथ यात्रेला सुरूवात झाली. हजारो दुचाकी व चारचाकी, चार विजयरथ, राम मंदिर प्रतिकृती, मर्दानी खेळ, डी.जे. ढोल पथक, झांज पथक, श्रीराम जिवंत देखावा, गंगा आरती, सनई चौघडे, महाबली हनुमान, कलश यात्रा, आतिषबाजी यासह हिंदू धर्माबाबत जागृती करण्यासाठी विविध देखावे सादर करण्यात आले.शीक्षेत्र अयोध्या येथील प्रभू श्रीराम जन्मभूमी मंदिरात होणारा प्राणप्रतिष्ठा सोहळा हा तमाम हिंदू बांधवांच्या आणि भारताच्या इतिहासामध्ये सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल. हिंदुत्व आणि अखंड भारताचा दुवा असलेले श्रीराम मंदिर हे यापुढील हजारो पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहणार आहे. या मंगलमय सोहळ्यानिमित्त पिंपरी-चिंचवड अगदी राममय झाले आहे. तमाम भारतवासीयांना या ऐतिहासिक सोहळ्यासाठी हार्दिक शुभेच्छा देतो. मनामनात राम असावा घराघरांत उत्सव साजरा करावा असे आवाहन आमदार महेश लांडगे यांनी केले.

### आ.लांडगे यांचा पायी प्रवास

» निगडी ते चिखली या रथ यात्रेच्या मार्गावर हजारो दुचाकी व चारचाकी सहभागी झाल्या. तसेच, रथ यात्रेच्या दोन्ही बाजुंनी सहभागी होत नागरिक, रामभक्त सहभागी झाले. पायी चालणाऱ्या रामभक्तांसोबत आमदार महेश लांडगे यांनी निगडी ते चिखली रामायण मैदानापर्यंत पायी प्रवास केला. तसेच, कारसेवक नंदकुमार सातुर्डेकर व सहकाऱ्यांची राम रथामध्ये मिरवणूक काढण्यात आली. नागरिकांनी दोन्ही बाजुंनी फुलांचा वर्षाव करीत रथ यात्रेचे स्वागत केले. पोलिसांनी चोख बंदोबस्त केला आणि वाहतुकीचे अचूक नियोजन केले.

# मोशीत रामभक्तांची सामूहिक महाआरती व हनुमान चालीसा पठण

## एक हजार महिलांच्या हस्ते महाआरती व भीमरूपी हनुमान चालिसा पठण

**मोशी**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

अयोध्येतील मंदिरात प्रभू श्रीरामाच्या मूर्तीची विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आहे. मोशी गावठाणातील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात एक हजार महिलांच्या हस्ते महाआरती व भीमरूपी हनुमान चालिसा पठण घेण्यात आले. मोशी परिसरात पहाटेपासून मंदीर आणि परिसरात सडा, रांगोळी, होमहवन, असे विविध धार्मिक कार्यक्रम झाले. परिसरातील शेकडो रामभक्तांनी सामूहिक रामरक्षा स्त्रोत पठण केले. परिसरातील मंदीरामध्ये महाआरती, महाप्रसाद,रामरक्षा पठण घेण्यात आले. काही ठिकाणी दुचाकी, चारचाकी रॅली काढण्यात आल्या. परिसरा तील सोसायट्यांमध्ये प्रभू श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापण सोहळा मोठ्या उत्साहत साजरा केला जात आहे. अनेक सोसायट्यांमध्ये गुढी उभारून, भगवे झेंडे, सजावट केल्याचे चित्र पहायला मिळत आहे. महाप्रसादाचे मोठ्या प्रमाणात नियोजन केले आहे. प्रत्येक सोसायट्यांमध्ये प्रत्यक्षात दिवाळी साजरी केल्याचे चित्र परिसरात पहायला मिळाले. रामनामात तल्लीन झालेले अबालवृध्द सोसायट्या आणि परिसरात पहायला मिळाले. चिमुकल्यांच्या शाळेला सुट्टी असल्याने हा सण मोठ्या उत्साहात साजरा करताना पहायला मिळाले. फेसबूक, वाट्सॲप, इन्स्टा हा सोशल मिडीया राममय झालेला पहायला मिळाले. प्रत्येकाच्या स्टेटसमध्ये मागील दोन दिवसांपासून रामाची महती, कार्यक्रमाची माहिती असा मजकूर ठेवला जात आहे. त्यामुळे वाट्सॲपही भगवे झाले.अयोध्येतील मंदिरात प्रभू श्रीरामाच्या मूर्तीची विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आहे.

# मनोज जरांगे पाटील यांच्या मुक्कामाची लोणावळ्यात जय्यत तयारी सुरू!

## शंभर एकर जागेवर जरांगे पाटील यांचा मुक्काम



**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील यांचा मुक्काम बुधवारी (दि. २४) लोणावळा येथे होणार आहे. पुणे - मुंबई महामार्गालगत वाकसई येथील संत तुकाराम पादुका स्थानजवळील शंभर एकर जागेवर जरांगे पाटील यांचा मुक्काम आणि सभेसाठी युद्धपातळीवर तयारी सुरू आहे.मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा आरक्षण योद्धे मनोज जरांगे-पाटील यांनी लाखो मराठा समाज बांधवांसह मुंबईकडे कूच केले आहे. २४ जानेवारीला जरांगे पाटील यांचा लोणावळ्यात सायंकाळी सहा वाजता सभेचे आयोजन करण्यात आले आहे.याठिकाणी लाखोंच्या संख्येने मराठा बांधव जमा होण्याची शक्यता असून मावळ तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा बांधवासाठी सेवाभावी वृत्तीने काम करण्यात येत आहे. सभेच्या स्थळाची पंधरा जेसीबीच्या सहाय्याने साफसफाई, स्वच्छता केली जाते आहे. जागेचे सपाटीकरणाचे करण्याचे काम सुरू आहे. लवकरच काम पूर्ण होईल. मराठा समाजाचे स्वयंसेवक याठिकाणी जातीने हजर राहत तयारी करत आहेत.

जरांगे पाटील यांचा दौरा

- मनोज जरांगे-पाटील सकाळ आठ वाजता वाघोली येथून निघणार.
- पुणे, पिंपरी-चिंचवड असे मार्गक्रमण करत दुपारी ते मावळात प्रवेश करतील.
- आंदोलकांसाठी प्रत्येक घरातून पंचवीस भाकरी, शेंगदाणा चटणी आणि ठेचा असा बेत.
- पाण्याचे ऐंशी टँकर तैनात करण्यात येणार.
- फिरत्या शौचालयांचीही व्यवस्था केली जाणार.

अशी आहे वाहन पार्किंग व्यवस्था

सभेला होणारी गर्दी गृहीत धरून जवळपास शंभर एकर जागेवर आंदोलकांच्या मुक्कामाची तर शिलाटणे, कार्ला, वेहेरगाव, वाकसई या गावांमध्ये वाहनांच्या प्रशस्त पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. महामार्गालगत असलेल्या हॉटेल्स, रिसॉर्ट्स चालकांनाही यासंदर्भात विनंती करण्यात आली आहे.२४ जानेवारीला जरांगे पाटील यांचा लोणावळ्यात सायंकाळी सहा वाजता सभेचे आयोजन करण्यात आले आहे.याठिकाणी लाखोंच्या संख्येने मराठा बांधव जमा होण्याची शक्यता असून मावळ तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा बांधवासाठी सेवाभावी वृत्तीने काम करण्यात येत आहे. सभेच्या स्थळाची पंधरा जेसीबीच्या सहाय्याने साफसफाई, स्वच्छता केली जाते आहे. जागेचे सपाटीकरणाचे करण्याचे काम सुरू आहे. लवकरच काम पूर्ण होईल.

# पिंपरी-चिंचवडमध्ये हजारो रामभक्तांचे सामूहिक रामरक्षा पठण

## श्रीमन् महासाधू श्री मोरया गोसावी क्रीडांगण हा उपक्रम पार पडला




**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** अयोध्येतील राम मंदिर उद्घाटन आणि मंदिरात विधिवत प्रभू श्रीरामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जात आहे. यानिमित्त चिंचवड येथे सामूहिक श्री रामरक्षा स्तोत्र पठण घेण्यात आले. त्यामध्ये पिंपरी-चिंचवडमधील शेकडो रामभक्तांनी व विद्यार्थ्यांनी सामूहिक रामरक्षा स्तोत्र पठण केले. चिंचवडगाव, केशवनगर येथील श्रीमन् महासाधू श्री मोरया गोसावी क्रीडांगण येथे हा उपक्रम पार पडला. या सोहळ्याला प्रसिद्ध निवेदक व अभिनेते राहुल सोलापूरकर, पद्मश्री गिरीश प्रभुणे, भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप, संस्कृती संवर्धन व विकास महासंघाचे अध्यक्ष हभप किसन महाराज चौधरी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पिंपरी-चिंचवड जिल्हा संघचालक विनोद बन्सल, जिल्हा कार्यवाह माहेश्वर मराठे, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हामंत्री धनंजय गावडे आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.राहुल सोलापूरकर म्हणाले की, अयोध्येचा इतिहास फार जुना आहे. अनेक मुस्लिम राजांनी अयोध्येवर आक्रमणे केली. रामजन्मभूमीसाठी इसवी सनपूर्व १५० पासून ८९ लढाया झाल्या आहेत. साडेचार लाख रामभक्तांनी बलिदान दिलेले आहे. आपली आहुती दिलेल्या रामभक्तांचे आपण सर्वांनी स्मरण केले पाहिजे. अयोध्या ही अमृत भूमी आहे. युद्ध करूनही जिंकता येत नाही, अशी ति भूमी आहे.

# केंद्र सरकारची नियमावली अन्यायकारक

## महाराष्ट्रात ७० टक्के शिकवण्या १६ वर्षांखालील मुलांच्या

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** खासगी शिकवण्यांना नियम असण्याबाबत हरकत नाही. मात्र १६ वर्षांखालील मुलांसाठी शिकवण्याच नकोत हा नियम अन्यायकारक असल्याचे सांगत खासगी शिकवणी चालकांनी केंद्र सरकारच्या नियमावलीविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. केंद्र सरकारच्या नियमावलीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील खासगी शिकवणी चालकांची नाशिक येथे २८ जानेवारीला बैठक होणार आहे. केंद्र सरकारच्या नियमावलीच्या नियमावलीविरोधात न्यायालयात दाद मागण्याची तयारी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या आत्महत्या, विविध स्पर्धा आणि प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठीच्या शिकवण्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नुकतीच नियमावली जाहीर केली. या नियमावलीनुसार दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा वयाची



१६ वर्षे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनाच आता शिकवणी वर्गाला प्रवेश देता येणार आहे. त्याचबरोबर किमान पदवी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांनाच शिक्षक म्हणून नियुक्त करता येईल. त्याचबरोबर प्रत्येक शिकवणी वर्गाने समुपदेशाची नियुक्ती करणे आवश्यक आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शिकवण्यांना १ लाख रुपयांपर्यंत दंड करण्याची किंवा नोंदणी रद्द करण्याची तरतूद करण्यात आली आहे. पुढील तीन महिन्यांत नव्याने सुरू होणाऱ्या किंवा असलेल्या शिकवण्यांनी नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. नोंदणी, पडताळणी, कारवाई आणि एकूण नियमनाची जबाबदारी राज्य शासनांची असेल, असेही नियमावलीत स्पष्ट करण्यात आले आहे.केंद्र सरकारच्या नियमावलीच्या पार्श्वभूमीवर खासगी शिकवणीचालक आक्रमक झाले आहेत. कोचिंग क्लासेस टीचर्स फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष आणि खासगी शिकवणी वर्गांसाठी नियमावलीसाठी राज्य सरकारने नियुक्त केलेल्या समितीचे सदस्य बंडोपंत भुयार म्हणाले, की खासगी शिकवण्यांना नियमावली असायला हरकत नाही. पाच राज्यांमध्ये तशी नियमावली आहे. महाराष्ट्रातही २०१८मध्ये समिती नेमण्यात आली होती. मात्र १६ वर्षांखालील मुलांना शिकवणीच नको हा निर्णय अन्यायकारक आहे. ७० टक्के शिकवण्या १६ वर्षांखालील मुलांच्या आहेत. करोना काळात मुलांचे शिक्षण कच्चे राहिले आहे. ते पक्के झाले पाहिजे. असरच्या अहवालानुसार आठवीच्या मुलांना तिसरी-चौथीचे धडे वाचता येत नाहीत. त्यामुळे सरकारनेच शिकवणी वर्ग नको म्हणणे हा विरोधाभास आहे. या निर्णयामुळे शिकवणीचालकांसह पालक विद्यार्थ्यांचेही नुकसान होणार आहे.

लाखो सुशिक्षित या क्षेत्रात कार्यरत आहेत. सरकारी नोकऱ्या, नोकरीच्या संधी नाहीत. त्यामुळे या निर्णयामुळे बेरोजगारी वाढेल. कोटासारख्या ठिकाणी विद्यार्थी मानसिक ताणामुळे आत्महत्या करण्याच्या घटना घडत असल्या, तरी तिथे शिकणारी विद्यार्थी १६ वर्षांवरील असतात. त्यामुळे सरकारच्या जाचक नियमावलीला विरोध आहे.नियमावलीच्या अनुषंगाने २८ जानेवारीला राज्यभरातील शिकवणीचालक, संघटनांची नाशिकमध्ये बैठक होणार आहे. त्यात आंदोलनाची दिशा ठरवण्यात येईल. आवश्यकता भासल्यास न्यायालयात दाद मागितली जाईल, असेही भुयार यांनी स्पष्ट केले.कोचिंग क्लासेस टीचर्स फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष आणि खासगी शिकवणी वर्गांसाठी नियमावलीसाठी राज्य सरकारने नियुक्त केलेल्या समितीचे सदस्य बंडोपंत भुयार म्हणाले, की खासगी शिकवण्यांना नियमावली असायला हरकत नाही. पाच राज्यांमध्ये तशी नियमावली आहे. महाराष्ट्रातही २०१८मध्ये समिती नेमण्यात आली होती. मात्र १६ वर्षांखालील मुलांना शिकवणीच नको हा निर्णय अन्यायकारक आहे. ७० टक्के शिकवण्या १६ वर्षांखालील मुलांच्या आहेत. करोना काळात मुलांचे शिक्षण कच्चे राहिले आहे. ते पक्के झाले पाहिजे. असरच्या अहवालानुसार आठवीच्या मुलांना तिसरी-चौथीचे धडे वाचता येत नाहीत. केंद्र सरकारच्या नियमावलीच्या नियमावलीविरोधात न्यायालयात दाद मागण्याची तयारी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या आत्महत्या, विविध स्पर्धा आणि प्रवेश परीक्षांच्या तयारीसाठीच्या शिकवण्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नुकतीच नियमावली जाहीर केली. या नियमावलीनुसार दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा वयाची १६ वर्षे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनाच आता शिकवणी वर्गाला प्रवेश देता येणार आहे.

# निगडीत पाच बांगलादेशी नागरिक अटकेत

## गोव्यातून पारपत्र काढल्याचे उघडकीस

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** बेकायदा वास्तव्य करणाऱ्या पाच बांगलादेशी नागरिकांना गुन्हे शाखेचे दहशतवादविरोधी पथक आणि निगडी पोलिसांनी अटक केली. ही कारवाई निगडीतील अंकुश चौकात करण्यात आली. आरोपींपैकी तीन जणांनी गोवा येथून पारपत्र काढल्याचे समोर आले आहे. रॉकी सामोर बरूआ (वय २८), जयधन अमीरोन बरूआ (वय २८), अंकुर सुसेन बरूआ (वय २६), राहुल शील्फोन बरूआ (वय



२८), राणा नंदन बरूआ (वय २५, सर्व रा. चित्तगोंग, बांगलादेश) अशी अटक आरोपींची नावे आहेत.जिकू दास ऊर्फ जॉय चौधरी (रा. चंदननगर, पुणे) हा फरार आहे. दहशतवादविरोधी पथकाचे पोलीस शिपाई सुयोग लांडे यांनी निगडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपी हे बांगलादेशी नागरिक आहेत. त्यांनी बनावट जन्मदाखला आणि अन्य कागदपत्रांद्वारे आधारकार्ड तयार केले. त्यानंतर सर्वजण निगडी येथील साईनाथनगर येथील चाळीत राहत होते. या ठिकाणी त्यांनी आधारकार्डवरील पत्ते बदलून पुण्यातील पत्ते टाकले. बनावट कागदपत्रांद्वारे तीन आरोपींनी गोवा येथून पारपत्र काढून घेतले. अन्य दोन आरोपींचे पारपत्र तयार करण्याची प्रक्रिया सुरू होती. याबाबत दहशतवादविरोधी पथकाला माहिती मिळाली. त्यांनी छापा टाकून पाच आरोपींना अटक केली.बेकायदा वास्तव्य करणाऱ्या पाच बांगलादेशी नागरिकांना गुन्हे शाखेचे दहशतवादविरोधी पथक आणि निगडी पोलिसांनी अटक केली. ही कारवाई निगडीतील अंकुश चौकात करण्यात आली. आरोपींपैकी तीन जणांनी गोवा येथून पारपत्र काढल्याचे समोर आले आहे. रॉकी सामोर बरूआ (वय २८), जयधन अमीरोन बरूआ (वय २८), अंकुर सुसेन बरूआ (वय २६), राहुल शील्फोन बरूआ (वय २८), राणा नंदन बरूआ (वय २५, सर्व रा. चित्तगोंग, बांगलादेश) अशी अटक आरोपींची नावे आहेत.

# महायुतीचे सरकार आल्यास मंत्रालयाचे स्थलांतर

## माजी मंत्री आदित्य ठाकरे यांची टीका

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**
तळेगाव दाभाडे येथे येणारी वेदान्त फॉक्सकॉन कंपनी खोके सरकारने गुजरातला पाठविली. त्यामुळे एक लाख तरुणांचा रोजगार हिरावला गेला. राज्यकर्ते सर्वच उद्योग गुजरातला घेऊन जात आहेत. महाराष्ट्रावर अन्याय करण्याचे कलम राज्य घटनेत टाकले आहे का, अशी शंका येतेय. घटनाबाह्य खोके सरकार पुन्हा डोक्यावर बसले, तर ते मंत्रालयही गुजरातला नेतील, अशी टीका माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी रविवारी केली. ठाकरे हे रविवारी मावळ दौऱ्यावर होते. लोणावळ्यात व्यायामशाळेचे उद्घाटन, तळेगाव दाभाडे येथे स्वागत आणि पिंपरीत 'महान्याय, महानिष्ठा' सभा झाली. खेडचे आमदार दिलीप मोहिते यांचे पुतणे डॉ. शैलेश मोहिते-पाटील यांनी ठाकरे गटात प्रवेश केला.ठाकरे म्हणाले, की




वेदान्त फॉक्सकॉन कंपनी एक लाख लोकांना नोकरी देणार होती. परंतु, हा प्रकल्प गुजरातला नेला. महाराष्ट्रात दोन वर्षांत हा उद्योग सुरू झाला असता. गुजरातमध्ये हा उद्योग सुरू करण्यासाठी आठ वर्षे लागतील असे कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला जात आहेत. विश्वचषकाचा अंतिम सामनाही मुंबईऐवजी गुजरातमध्ये घेण्यात आला. त्यामुळेच भारताचा पराभव झाला.पिंपरी महापालिकेत हस्तांतरित विकास हक्क (टीडीआर), कचरा, करोनातही घोटाळा झाला आहे. घोटाळेबाज सरकारमध्ये केवळ घोटाळेच सुरू आहेत. २०२४ मध्ये आमचे सरकार आल्यानंतर ज्या लोकांनी, मंत्र्यांनी, अगदी मुख्यमंत्री, अधिकाऱ्यांनी जनतेचे पैसे खाल्ले असतील. त्यांना कारागृहात बसवून पैसे मोजायला लावून सरकारच्या तिजोरीत भरायला लावले जातील, असे आदित्य ठाकरे यांनी सांगितले.मुख्यमंत्री आमचे ऐकत नाही, राज्याचेही ऐकत नाहीत, महाराष्ट्राचा ऐकत नाहीत, ते फक्त गुजरातचे ऐकतात. हे सरकार पडणार म्हणजे पडणार आणि आपले सरकार नक्की बसणार. ज्या अधिकार्यांनी, मंत्र्यांनी आणि मुख्यमंत्र्यांनी या महाराष्ट्राला गुजरातच्या आदेशावरून लुटले त्या सर्वांना जेलमध्ये टाकू, असा थेट इशाराच युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांनी दिला आहे.

युवासेनेतर्फे सणस मैदानावर आयोजित 'युवा खेळ समिट' महोत्सवाचा समारोप आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीत झाला. त्यानंतर मैदानाबाहेर कर्मवीर भाऊराव पाटील चौकात झालेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. पक्षाचे जिल्हा संपर्क प्रमुख सचिन अहिर, सहसंपर्क प्रमुख आदित्य शिरोडकर, माजी मंत्री शशिकांत सुतार, माजी आमदार महादेव बाबर व चंद्रकांत मोकाटे, शहरप्रमुख संजय मोरे व गजानन थरकुडे आदी उपस्थित होते.

आदित्य ठाकरे म्हणाले, भाजप राममंदिराचा मुद्दा विसरून गेली होती, त्यावेळी आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थळ शिवनेरीवरील मूठभर माती अयोध्येत नेऊन 'पहिले मंदिर फिर सरकार' हा निर्धार केला होता. 'रघुकुल रीत' प्रमाणे सरकार आल्यावर शेतकरी कर्जमुक्तीचा निर्णय घेतला. कोरोना संकटकाळात खरी आकडेवारी दाखवली.

### दावोसमधून राज्यासाठी काय आणले?

**» आमच्या हिंदुत्वात महिलांचा सर्वोच्च सन्मान राखला जातो. बलात्कार्यांना फासावर लटकवले जाते. भाजपच्या हिंदुत्वात पॅरोलवरील बलात्कार्यांचा सत्कार केला जातो. अर्थमंत्री फंड देत नाहीत, अशी तक्रार शिंदे गटाचे आमदार करत होते. आता अर्थमंत्री कोण आहेत, हे चाळीस गद्दारांनी सांगावे. भाजपकडे असणारे पालकमंत्रिपद आता कोणाकडे आहे, असा प्रश्न भाजपच्या कार्यकर्त्यांना केला. महाविकास आघाडीने प्रस्तावित केलेले पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ रद्द करण्यात आले. लोहगाव विमानतळाची नवीन इमारत चार महिन्यांपासून बांधून तयार असूनही, खोके सरकारला उद्घाटनासाठी वेळ मिळत नाही, असा टोलाही त्यांनी लगावला.**

# दानवे यांनी कुटूंबियासह घेतले जेजुरीच्या खंडेरायाचे दर्शन

## शिवसेनेच्या लढाईत यश मिळू दे, अशी प्रार्थना त्यांनी केली

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।**
विधान परिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी रविवारी (दि. २१) महाराष्ट्राचे कुलदैवत श्री. खंडोबाचे सहकुटुंब मनोभावे दर्शन घेतले.

शिवसेनेच्या लढाईत यश मिळू दे, अशी प्रार्थना त्यांनी केलीअंबादास दानवे यांचे चिरंजीव चिरंजीव धर्मराज व स्नुषा रश्मी यांच्या विवाहानंतर



नवजोडप्याने मल्हारी मार्तंड यांच्या चरणी नतमस्तक होणे परंपरा आहे. त्याचा आदर ठेवत त्यांनी या परंपरेची जपणूक केली आहे. याप्रसंगी त्यांच्यासमवेत शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मोहिते, महिला आघाडी जिल्हा संघटक अरुणा हरपाळे, युवा सेना तालुकाप्रमुख वैभव कोलते, जेजुरी शहरप्रमुख किरण दावलकर, अमित पवार, महेश स्वामी व सुदाम शिनगारे उपस्थित होते.धर्म परंपरेला साक्ष मानून वैवाहिक आयुष्यास सुरुवात केलेल्या या दापत्यांचे आयुष्य सुख- समाधानाने जाऊ दे, अशी प्रार्थना त्यांनी यावेळी केली. तसेच पारिवारिक प्रसंगानिमित या शक्तिस्थळी आलो असलो तरीही पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्र धर्मासाठी सुरू केलेल्या लढाईस यश मिळू दे, अशी मल्हारी मार्तंड यांच्या चरणी अंबादास दानवे यांनी प्रार्थना केली.

दरम्यान, अंबादास दानवे परिवाराच्या वतीने खंडोबा देवाचे दर्शन, कुलधर्म कुलाचारानुसार तळी भंडारचा विधी करून भंडाराची उधळण केली. यावेळी दानवे यांनी ४२ किलो खंडा तलवार उचलून शक्तीचे प्रदर्शन केले. श्री. मार्तंड देवसंस्थानच्या वतीने विश्वस्त मंगेश घोणे यांनी अंबादास दानवे यांचा खंडोबा देवाचा फोटो देवून सन्मान केला.